World Wide Journal of Multidisciplinary Research and Development




WWJMRD 2019; 5(1): 108-109
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''सुवार्ता आणि पवित्रशास्त्र''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
The gospel of Christ is not given by word of mouth, but by the power of God. John MacArthur states, "Scripture is not a repository of knowledge and intuition for mankind, even religious saints. Sustainable (Sources 119: 89). Peter says that the Word of God is a sign of the divine sign on the people of the earth. revealed according to and authorized by the will of God." Man has told God. ) In fact, the heavenly word of God appears in his words, not the power of salvation or the means of salvation, but the mediator of salvation. " Are they accepted in heaven? Why is it just a word? Today, many pastors and Christian writers need to thoroughly examine their own message, word of literature, prayer, gospel, their personal life. God is the inspiration behind all this, this is the word of my intellect.

**Keywords:** God, Salvation, Scriptures, Literature, Gospel, Heaven, Message, Scripture, Holy Spirit

**प्रस्तावना:**
ख्रिस्ताची सुवार्ता ही श्ब्द्फेकाने नव्हे तर देवाच्या सामर्थ्याने दिली जाते.जॉन मैकआर्थर म्हणतात "पवित्र शास्त्र हे मानवाच्या,अगदी धार्मिक साधुसंतांच्या देखील बुद्धीमत्तेचे व अंतर्ज्ञानाचे भांडार नव्हें.ते देवाचे सत्य,देवाच्याच शब्दात,त्याचेच वचन आहे.स्रोतकर्त्याने म्हटले "हे परमेश्वरा तुझे वचन स्वर्गात सर्वकाळ स्थिर आहे (स्रोत 119:89). पृथ्वीवरील माणसांना देवाचे वचन,दैवी संकेतानुसार प्रकट होऊन ते स्वर्गात दैवी इच्छेने अधिकृत करण्यात आले आहे म्हणून पेत्र सांगतो."हे प्रथम मनात आणावयाचे की शास्त्रातील कोणत्याही संदेशाचा स्वतःच्या कल्पनेने उलघडा होतं नाही. "कारण संदेश मनुष्याच्या इच्छेने कधी झालेला नाही; तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या मनुष्यानी देवापासून तो सांगितलेला आहे."(२पेत्र १ :२०-२१) खरे पाहता देवाचे स्वर्गीय वचन त्याच्या शब्दांनी प्रकट झालें असून ते तारणाचे सामर्थ्य किंवा ते तारणाचे साधन नसून, ते तारणाचा मध्यस्थ असे आहे."
ख्रिस्ती साहित्य हे देखील स्वतच्या कल्पनेने लिहिणे शक्य नाही आणि तसे करणे म्हणजे शास्त्राचा विरोध करणे होय.त्यामुळे कोणत्याही ख्रिस्ती साहित्यिकांनी हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की देवाचे वचनच ख्रिस्ती साहित्य लिहिण्यास प्रेरित करते.कारण कोणतेही प्रकटीकरण आतापर्यंत मनुष्याच्या इच्छेने झालेले नाही.तर पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने देवाच्या लोकांना ते होत असते.त्यामुळे साहित्य लेखन हे फक्त श्ब्द्फेक नव्हे तर देवाचे प्रकटीकरण आहे.
वचन स्पष्ट सांगते संदेश कधीच मनुष्याच्या इच्छेने प्रगट होतं नाही. पण आज जर मंडळीतील संदेश पाहिला तर ती फक्त पाळकांची शब्दफेक असते. त्याला पवित्र आत्म्याची प्रेरणा अथवा जोड नसते म्हणजे तो संदेश ईश्वरप्रेरित नसून स्वयं प्रेरित असतो. उदाहरणार्थ यहूदा सांगतो त्याप्रमाणे "ते अभक्त आहेत व आपल्या देवाची कृपा पालटून तिला कामातुरपणाचे स्वरूप आणतात."
ख्रिस्ती साहित्य लेखनाचा आधार देखील देवाची आहे.आणि ते ईश्वरप्रेरित हव्हे त्याला शास्त्राची जोड हवी.तेव्हाच त्याला ख्रिस्ती साहित्य म्हणता येईल.मंडळीला देवाचे सत्य वचन कसे प्राप्त होईल.? कारण संदेश दिल्यावर त्या संदेशाची पुष्टी आणि अंमलबजावणी स्वर्गात प्रभू येशू देवासमोर मांडतो आणि देव त्या संदेशाला अथवा साहित्याला अंतिम मुहर लावतो.मग आज या जगात हजारो ख्रिस्ती पुस्तके रोज प्रकाशित होत असतात,रोज हजारो संदेश दिले जातात,पण ते ईश्वर प्रेरित आहे का.? ते स्वर्गात मान्य होतात का.? का फक्त ती शब्दफेक आहे.आज भरपूर पाळकांना आणि ख्रिस्ती साहित्यिकांना स्वतःचा संदेशाची,साहित्यालेखनाची वचनाची,प्रार्थनेची,सुवार्तेची,व्यक्तीगत जीवनाची पूर्ण चौकशी करण्याची

गरज आहे. की या सर्व गोष्टीच्या  मागे देवाची प्रेरणा आहे की माझी बुद्धीमत्तेची शब्दफेक आहे.

**संदर्भसूची:-**

**1.** पेत्राचे दुसरे पत्र अध्याय १ : वचन २०-२१-पवित्रशास्त्र